सेवा आरोग्य

विवेक व्यासपीठ

Reg. No. MAH/F-19710 Bombay परम वैभवासाठी कृतीशील

# सेवा आरोग्य फाऊंडेशन

## समृद्धी वर्ग

## वार्षिक अहवाल २३-२४

# समृद्धी वर्ग

सेवा आरोग्य फाऊंडेशन आरोग्य क्षेत्रात काम करणारी सामाजिक संस्था आहे. आरोग्य वर्धन, समृद्धी वर्ग “घे भरारी”किशोर विकास प्रकल्प आणि असे प्रकल्प संस्थेच्या मध्यमातून कोथरूड, कर्वेनगर, उत्तमनगर,परमहंसनगर,वारजे अशा विविध ठिकाणी चालू आहेत.

“समृद्धी वर्ग” हा ३ ते १२ वयोगटातील मुलांचा शारीरिक,बौद्धिक,मानसिक विकास व्हावा म्हणून प्रार्थना,गोष्ट,गाणी,खेळ,चित्रे, याबरोबरच स्वच्छतेची आवश्यकता,चौरस आहार,चांगल्या सवयी आरोग्य, कुटुंबातील छोट्या छोट्या जबाबदाऱ्या घेणे.एकमेकांना मदत करणे चांगली वर्तणूक,सण उत्सवाची विज्ञाननिष्ठ माहिती चांगल्या परंपरांचा आदर ,रक्षण आणि वाईट चुकीच्या चालीरीतींवर साधक - बाधक चर्चा वेगवेगळ्या क्षेत्रातील आदर्श व्यक्तींची ओळख,माहिती ,नेते,खेळाडू यांच्या चरित्राचा परिचय विविध कलागुणांना वाव या सारखे अनेक उद्देश डोळ्यासमोर ठेवून कार्यक्रमांचे, उपक्रमांचे नियोजन करणारा प्रकल्प.


वस्तीतील मुलांशी मैत्री करत त्यांना आनंद मिळेल ,दंगामस्तीच्या ,मजेच्या वातावरणात शिक्षणाचे ,वाचनाचे ,नैतिक मूल्यांचे धडे मिळतील आणि हे करता करता स्वत:च्या व्यक्तिमत्वाचा विकास घडविता येईल असा विचार करून सुरु झालेला प्रकल्प म्हणजेच “ **समृद्धी वर्ग** “.

आपल्या रोजच्या व्यावहारिक जीवनात आपले स्वतःचे जीवन समृद्ध करून स्वतःच्या कुटुंबा सोबत समाज,देश यांच्या प्रगतीचे स्वप्न पहायला शिकवणारा,पुढे जाताना आपल्यासह इतरांनाही घेतले पाहिजे ही जाणीव करून देण्याचा प्रयत्न आपण या प्रकल्पामध्ये करतो.

एकूण **२०** वस्त्यांमध्ये वर्ग चालू आहेत.प्रत्येक वर्गात साधारण २० ते २५ मुलांची उपस्थिती असते.एकूण **५४०** मुलांची संख्या

# उदिष्टे

- मनोरंजनाच्या साधनांचा योग्य वापर
- शिक्षणाची व वाचनाची आवड निर्माण करणे.
- वेळेचे महत्व
- चांगल्या सवयी
- सामजिक बांधिलकी ची जाणीव निर्माण करणे.
- पालकांची भूमिका समजून घेणे.



# विशेष उपक्रम

| उपक्रम | Activity | उद्देश | परिणाम |
| --- | --- | --- | --- |
| Wall painting | बालवाडीच्या भिंतींवर मुलांकडून फळे ,भाज्या ,मासे ,अंक अशी चित्र रंगवून घेतली. | मुलं जी नेहमी कागदावर चित्र रंगवतात त्यापेक्षा असे रंग देण्याचा आनंद व अनुभव घेता यावा . | मुलांना wall painting करण्याचा चा अनुभव पहिल्यांदा घेता आला. |
| शिवराज्याभिषेक दिन | मुलांनी वर्गात पोवाडा ,नृत्य,गीत,लाठी काठी असे कार्यक्रम घेऊन शिव्राज्याभिषेक दिन साजरा केला. | छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल मुलांच्या मनात आदर निर्माण व्हावा | मुलांनी त्यांच्या बद्दल ची माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला. त्याचा उपयोग सादरीकरणात केला. |
| स्कूल कीट वितरण | मुलांना त्याच्या इयत्ता नुसार शाळेला लागणारे साहित्य देण्यात आले. | मुलांच्या शालेय उपयोगी वस्तू त्यांना मिळाव्यात व मुल वर्षभर नियमित येतात.त्यांना प्रोत्साहन मिळावे. | मुलांची संख्या वाढली.मुले नियमित वर्गाला यायला लागली. |
| गणपती कार्यशाळा | मुलांसाठी शाडू मातीचे गणपती बनवण्याची कार्यशाळा घेतली. | मुलांमधील गुणांना वाव मिळावा | मुलांनी आपल्या मधील स्किल चा उपयोग करून खूप सुंदर गणपती बनवले. |
| फिल्ड व्हिजीट | आंबेगाव पठार येथील शिवसृष्टीला मुलांना दाखवली. | मुलांना ऐतिहासिक गोष्टी प्रत्यक्षात पहायला मिळाव्या किंवा पहायला मिळाव्या | मुलांना प्रत्यक्ष शिवसृष्टी पाहण्याचा अनुभव हा खूप सुंदर होता.मुलं खूप आनंदी होती |
| दीपोत्सव | मुलांनी वेगेवेगळे सांस्कृतिक कार्यकम सादर केले | मुलांनी खूप सुंदर सादरीकरण केले. | मुलांमधील कलागुणांना वाव मिळाला. |
| पालक हळदी कुंकू व पालक सभा | समृद्धी वर्गातील मुलांच्या पालकांसाठी हळदी कुंकू कार्यक्रम केला. | हळदी कुंकू च्या निमित्ताने मुलांच्या पालकांशी संवाद साधता यावा. | पालकांशी संवाद साधता आला.नवीन पालकांची ओळख झाली. |
| आरोग्य शिबीर | मुलांसाठी आरोग्य तपासणी शिबीर केले. | मुलांच्या आरोग्याची तपासणी व्हावी. | मुलांना आरोग्यविषयक जागरूक करणे. |

सेवा आरोग्य

विवेक व्यासपीठ
परम वैभवासाठी कृतीशील




















# नियमित उपक्रम

| उपक्रम | उद्देश | उपस्थिती |
|---|---|---|
| जलसंधारण दिनानिमित्त पाणी बचत व पुनर्वापर याचे चित्र मुलांकडून काढून घेतली | कलेच्या माध्यमातून मुलांना पाणी बचतीचे महत्व कळावे. | १३१ |
| दीप अमावस्या निमित्त मुलांना घरातील दिव्यांची पूजा करण्यास सांगितले | मुलांना त्या अमावस्या बद्दल योग्य माहिती मिळावी . | १६२ |
| रक्षाबंधन निमित्त राखी तयार करणे व वस्तीतील काही कार्यकर्त्यांना राखी बांधणे | मुलांमध्ये सामाजिक रक्षा बंधनाची जाणीव निर्माण व्हावी म्हणून हा उपक्रम घेतला. | २९८ |
| हत्ती दिनानिमित्त मुलांना हत्तीचे चित्र दाखवून माहिती सांगितली.व त्याच्या अवयवांचा त्याला कसा उपयोग होतो याची माहिती दिली. | मुलांना प्राण्यांचे महत्व कळावे | २७२ |
| हिंदी दिनानिमित्त मुलांना एकमेकांशी बोलयला सांगितले | मुलांना हिंदी भाषा समजते त्यांना आपली राष्ट्र भाषा बोलता यावी | २८२ |
| राष्ट्रीय गुलाब दिनानिमित्त मुलांकडून कागदी गुलाबाचे फुल तयार करवून घेतले | मुलांना आर्ट क्राफ्ट करण्याची संधी मिळावी | २८५ |
| मातृदिनानिमित्त मुलांच्या आईला वर्गावर बोलवून मुलांनी ओक्षण केले. | मुलांना मातृदिनाचे महत्व कळावे | २८५ |
| आंतरराष्ट्रीय वृद्ध दिनानिमित्त मुलांना आपल्या आजी आजोबा यांना फोन करून त्यांच्याशी बोलायला लावले . | मुलांना घरातील वृद्ध व्यक्तींचे महत्व कळावे. | २८६ |
| घटस्थापना निमित्त मुलांना कुंडीत किवा एखाद्या भांड्यात बिया पेरून त्याचे रोप होईपर्यंत त्याची निगा राखण्यास सांगितले. | मुलांना फक्त झाड लावायचे नाही तर ते जतन करणे हि आपलीच जबाबदारी आहे हे मुलांना कळावे. | २५७ |
| ध्वज दिनानिमित्त मुलांना ध्वजातील तीन रंगांची माहिती व त्या रंगांचे महत्व सांगितले. | मुलांना ध्वजाचे व त्यातील रंगाचे महत्व समजावे. | २८७ |
| गणित दिनानिमित्त मुलांचे काही गणिती खेळ घेतले.प्रक्रिया संस्थेच्या गणित समारोह पहायला नेले. | खेळातून मुलांना गणिताची पाढ्यांची गोडी निर्माण व्हावी. | २७४ |
| शारीरिक शिक्षण दिनानिमित्त मुलांकडून सूर्यनमस्कार करवून घेतले. | मुलांना व्यायामाची सवय लागावी. | २८५ |
| मराठी राजभाषा दिनानिमित्त मराठी घोषवाक्य,कविता,म्हणी,समानार्थी शब्द विरुदार्थी चारोळ्या यांचे पोस्टर तयार करून वाचून घेणे. | मुलांना मराठी भाषेचे महत्व कळावे . | २९२ |

सेवा आरोग्य

विवेक व्यासपीठ

Reg. No. MAH/F-19710 Bombay परम वैभवासाठी कृतीशील



















# समृद्धी वाचनालय

समृद्धी वर्गातील मुलांना वाचनाची आवड निर्माण व्हावी म्हणून सगळ्या समृद्धी वर्गामध्ये आपण वाचनालय सुरु केले.प्रत्येक वर्गात ३०/३५ पुस्तकांचा संच दिला आहे.

मुलांना घरी पुस्तक वाचायला दिले जाते व वाचून झाल्यावर पुस्तक परत करताना त्या पुस्तकाचा एक फीडबॅक फॉर्म भरून घेतला जातो.महिन्यातून एकदा वर्गातील एका मुलांने पुढे येऊन आपण वाचलेल्या पुस्तकातून आपल्याला काय समजले ते आपल्या भाषेत वर्गात इतर मुलांना गोष्टी स्वरुपात सांगतात.

लहान मुलांना मोठ्या फॉन्ट ची पुस्तक वाचण्यासाठी दिली त्या मधील चित्र पाहून मुले आवडीने पुस्तक वाचू लागली आहेत.पुढे येऊन बोलायला लागली.

मुलांच्या अभ्यासात मदत व्हावी म्हणून मुलांकडून सरळ अंक वाचन ,उलट अंक वाचन, बाराखडी वाचन - लिखाण, बाराखडी पासून शब्द तयार करणे.गणिता मधील बेसिक क्रिया ,त्याचा सराव करून घेतो.त्यांना त्यांच्या अभ्यासात मदत करणे.मुलांचे हस्ताक्षर वळणदार यावे म्हणून मुलांना अक्षर वळणाच्या पाट्या देऊन त्यांचा सराव घेतला जातो.

मुलांच्या या बेसिक अभ्यासाच्या सरावामुळे मुलांना त्याची गोडी निर्माण होत आहे.मुलांमध्ये बदल दिसून येत आहेत.अश्या पालकांच्या प्रतिकिया येतात.





सेवा आरोग्य

विवेक व्यासपीठ

# पालक प्रतिक्रिया

## अस्मिता निकते

वर्गात होणारे उपक्रम खूप छान घेतले जातात. त्यामुळे मुलांना वर्गाला येण्याची आवड निर्माण होते. समृद्धी वर्गात होणाऱ्या उपक्रमांमुळे माझी मुलगी अभिमन्या निकते ही खूप active झाली. तिला आवड निर्माण झाली माझी मुलगी कुठेही गेली तर घाबरायची खूप शांत राहायची आत्ता ती न घाबरता बोलते.शाळेतली प्रगती सुद्धा त्यामुळे सुधारली आहे.

## प्रियांका तिकोने.

माझा मुलगा सिद्धांत तिकोणे हा अजिबात ऐकायचा नाही त्याची अभ्यासातील प्रगती इतकी चांगली नव्हती. घरी स्वतः हून अजिबात अभ्यास करायचा नाही.समृद्धी वर्गात यायला लागल्यामुळे त्याचे बेसिक गोष्टी सुधारल्या. एकत्रित मुलांमध्ये होणारे पाढे, बाराखडी, तसेच वाचन त्यामुळे खूप सुधारणा झाली त्याला आवडू लागलं. तो आत्ता स्वतः हुन अभ्यासाला बसतो.

## शिवन्या अडसूळ .

माझी मुलगी शिवन्या नवीन असताना वर्गात कोणत्याच ॲक्टिव्हिटी मध्ये भाग घेत नव्हती ती शाळेत सुद्धा गप्प असायची , परंतु नंतर ती हळूहळू वर्गातील सर्व उपक्रमांमध्ये भाग घेऊ लागली. ती शाळेत सुद्धा खूप चांगल्या प्रकारे उपक्रमांमध्ये भाग घेते व भाषण असो किंवा अन्य कोणतीही स्पर्धा असो त्याती भाग सहभागी होते. तिच्यामध्ये हे बदल समृद्धी वर्गाला यायला लागल्यापासून दिसून आले....

## जोया जावेद शेख **पालक - जावेद शेख**

माझी मुलगी जोया ही समृद्धी वर्गाला यायला लागल्यापासून तिला मराठी वाचायला येऊ लागले. म्हणजेच काना, मात्रा ,वेलांटीचे शब्द वाचायला आवडू लागले.तसेच आजपर्यंत तिने प्रत्येक उपक्रमात भाग घेतला आहे. तिला समृध्दी वर्गाला यायला खूप आवडते.